# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

**दिनांक २५.०९.२०२६ शुक्रवार**

**(कामगिरी)**

**गिट्टीखदान पोलीसांची कामगिरी :— जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना ०४ तासात अटक.**

फिर्यादी शोएब खान वल्द जाहेद खान, वय २७ वर्षे, रा. २१०, अंदर उर्छा गेट, शहर कोतवाली, झांशी (उत्तरप्रदेश) हे ए.सि. रिपेरिंग तसेच, हैदराबाद येथुन फ्रुट एक्सपोर्ट—इंपोर्ट करण्याचे काम करतात. मागील तीन वर्षापासुन ते आरोपी बिट्टु ठाकुर व निखील खाकरे यांना ओळखतात. फिर्यादी हे नागपुरात येत असल्याबाबत त्यांनी आरोपींना माहीती दिली होती. दिनांक २४.०९.२०२६ चे १२.०० वा. फिर्यादी हे नागपुरला आले. रेल्वे स्टेशन येथे दोन्ही आरोपीं फिर्यादींना भेटले. फिर्यादी हे रेल्वे स्टेशन जवळील एका हॉटेलमध्ये मुक्कामी थांबले दोन्ही आरोपी हे सुध्दा सोबत होते. फिर्यादी यांनी खर्चाकरीता एटीएम मधुन ५४,०००/—रू. काढले. रात्री २१.३० वा. चे सुमारास, त्यांचे रूममध्ये ०३ ईसम आले व त्यांनी ते बिट्टु व निखील चे मित्र असल्याचे सांगुन, त्यांची नावे रजत, समीर व प्रवेश असे सांगीतले. रात्री २३.०० वा. चे सुमारास, आरोपींनी त्यांना बोरगांव, गिट्टीखदान येथे काम असल्याचे सांगुन फिर्यादीला सुध्दा सोबत चलण्यास म्हटले असता, फिर्यादी हे त्यांचेसोबत त्यांचे दुचाकीवर निघाले. पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत दिनशॉ फॅक्टरी जवळील बुध्द विहारसमोर, बोरगांव चौक येथे आरोपींनी त्यांच्या दुचाकी थांबविल्या व संगणमत करून, फिर्यादी यांना मारहाण करून, त्यांचे जवळील आयफोन १६ प्रो, व रोख ५४,०००/—रू. जबरीने हिसकावुन तेथुन पळुन गेले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे गिट्टीखदान येथे आरोपीविरूध्द कलम ३१०, ११५(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन, गिट्टीखदान पोलीसांनी आरोपींबाबत संपुर्ण माहीती नसतांना, त्यांचेबाबत माहीती काढुन, आरोपींना निष्पन्न केले. व आरोपी १) तारेंद्र उर्फ बिट्टु सनत ठाकुर, वय २३ वर्षे, रा. मोहन नगर, खलासी लाईन, सदर, नागपुर २) निखील ताराचंद खाकरे, वय २३ वर्षे, रा. सोनु पान पॅलेस जवळ, नारा, जरीपटका, नागपुर ३) रजत राजेंद्र बोनगिरी, वय २५ वर्षे, रा. गड्डीगोदाम, गोलबाजार मागे, सदर, नागपुर ४) समी उर्फ समीर वल्द सलीम शेख, वय १९ वर्षे, रा. सेंट मेरी शाळेजवळ, गोरेवाडा रोड, मानकापुर, नागपुर व ५) त्रवेश दिपक कांबळे, वय २० वर्षे, रा. झिंगाबाई टाकळी, गोधनी रोड, मानकापुर, नागपुर यांचा शोध घेवुन, सापळा रचुन, त्यांना ०४ तासाचे आंत ताब्यात घेतले. आरोपींना विचारपुस केली असता, त्यांनी वर नमुद जबरी चोरीचा गुन्हा संगणमताने केल्याची कबुली दिली. आरोपींना अटक करण्यात आली व आरोपींचे ताब्यातुन रोख ४७,०००/—रू., फिर्यादीचा आयफोन, गुन्ह्यात वापरलेली दोन दुचाकी वाहने व ०३ मोबाईल फोन असा एकुण अंदाजे ३,००,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. शिवाजी गायकवाड, सहा. पोलीस

आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. देवाजी नरोटे, सपोनि. बालाजी लालपालवाले, पोउपनि. खुशाल राठोड, पठाण, पोहवा. महेश बावणे, सतीष ठाकुर, पोअं. आकाश लोथे, राज वानखेडे व अमित तांडेकर यांनी केली.




**२) मानकापुर पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक, एकुण ०६ गुन्हे उघडकीस.**

पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत, प्लॉट नं. ६०१, मेडप्लस फार्मसीजवळ, फरस चौक, नागपूर येथे राहणारे फिर्यादी तुषार देवराजवी ढोबळे, वय ३६ वर्षे यांचे मेडप्लस फार्मसीजवळ डेली निड्स चे दुकान आहे. दिनांक २२.०९.२०२६ चे २२.०० वा. ते दिनांक २९.०९.२०२६ चे ०७.०० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी त्यांचे दुकानाचे शटरला लॉक लावुन, घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे शटरचे लॉक तोडुन, आंत प्रवेश करून, दुकानमधील सिगारेट पॅकेट्स, ड्रॉव्हरमधील रोख १,५००/—रू. असा एकुण किंमती ८,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. अशा फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे मानकापुर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३), ३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान मानकापुर पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी सिसिटीव्ही फुटेजची पाहणी केली असता, त्यांना दोन संशयीत ईसम दिसुन आले. पोलीसांनी तांत्रीक तपास करून व मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, आरोपी कासीब शेख उर्फ गोलु वल्द मोहम्मद वकील शेख, वय १९ वर्षे, रा. सलीम शेख यांचे घरी किरायाने, कब्रस्तान गल्ली, मदरसा जवळ, मोमीनपुरा, तहसिल, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहीजे आरोपी नामे राजु धुर्वे याचेसोबत संगणमताने वर नमुद घरफोडीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. मा. न्यायालयातुन आरोपीची पोलीस कोठडी प्राप्त करण्यात आली. आरोपीस अधिक सखोल विचारपुस केली असता, त्याने वर नमुद गुन्ह्याव्यतीरिक्त पोलीस ठाणे मानकापुर हद्दीत ईतर ०२ वाहन चोरीचे गुन्हे तसेच, पो. ठाणे यशोधरानगर हद्दीत ०१ ठिकाणी वाहनचोरी, पोलीस ठाणे कपीलनगर हद्दीत ०१ चोरी आणि पोलीस ठाणे कोराडी हद्दीत ०१ चोरीचा गुन्हा असे एकुण ०६ गुन्हे केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन रोख रक्कम, वेगवेगळ्या कंपनीचे सिगारेट पॅकेट्स, सिल्व्हर रंगाची ॲक्सेस मोपेड क्र. एम.एच ३१ एम.एफ ९६२५, काळ्या रंगाची ॲक्सेस मोपेड क्र. एम.एच ३१ ई.जे ३४३०, सिल्व्हर रंगाची ॲक्सेस मोपेड क्र. एम.एच ३१ डि.एल १०७०, ग्रे रंगाची ॲक्टीवा मोपेड गाडी मोपेड क्र. एम. एच ४९ बि.पी ३४१८, काळ्या—पिवळ्या रंगाची ईलेक्ट्रीक मोटार आणि ०१ रेंजर सायकल असा एकुण ३,४८,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीकडुन घरफोडी व वाहनचोरीचे एकुण ०६ गुन्हे उघडकीस आणलेले आहेत. पाहीजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. विश्वास नांगरे पाटील पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह पोलीस आयुक्त, नागपूर शहर, मा. श्रीमती विनीता शाहु अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंह, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. शिवाजी गायकवाड, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. हरीश काळसेकर, पोउपनि. उध्दव पोखरकर, श्रेणी पोउपनि. सुनिल डगवाल, नापोअं. विजय यादव, पोअं. अनुप यादव, आशिष सातपुते व अजय घाटे यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे पाचपावली :—शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २५.०९.२०२६ चे ०२.४५ वा. चे सुमारास, पाचपावली पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना बुध्द मुर्ती चौक, लष्करीबाग, पाचपावली येथे एका अर्टीगा कारमध्ये काही इसम संशयास्पदरित्या दिसल्याने, कारजवळ जात असता, कारमधील दोन ईसम कारमधुन उतरून तेथुन पळुन गेले. दोन ईसमांना पोलीसांनी ताब्यात घेवुन पंचासमक्ष त्यांना त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नावे १) हर्ष संजय खंडारे, वय २४ वर्षे, रा. प्लॉट नं. ३८५, पंचशिल नगर, जुने पोस्ट ऑफीस रोड, पाचपावली, नागपुर २) निहाल अनिल भालाधरे, वय १९ वर्षे, रा. लष्करीबाग, आवळेबाबु चौक, कांबळेचे घरी किरायाने, नागपूर असे सांगीतले. त्यांची व कारची झडती घेतली असता, कारमध्ये एक लोखंडी तलवार, एक निळ्या रंगाचा बेसबॉल दंडा, ०५ मोबाईल फोन, ०१ ईलेक्ट्रॉनिक वजन काटा असा मुद्देमाल मिळुन आला. आरोपींचे ताब्यातुन नमुद मुद्देमाल व कार क्र. एम.एच ४९ सि.डब्ल्यु २११० असा एकुण किंमती ७,५१,३००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांचे पळुन गेलेल्या साथीदारांविषयी विचारपुस केली असता, त्यांनी तो लक्की रामटेके व त्याचा मित्र दोन्हीही रा. लष्करीबाग असल्याचे सांगीतले.

आरोपी हे कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने तलवार व बेसबॉल दांडा बाळगुन समक्ष मिळुन आल्याने व त्यांनी मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोअं. नागनाथ कोकरे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे पाचपावली येथे सपोनि. गजानन अन्सापुरे यांनी आरोपींविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. पाहीजे आरोपींचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**स्वा/—**

**( नितीन चुलपार )**

**सहा.पोलीस निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

# अधिसुचना

## भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे

विषय :— भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश.

ज्याअर्थी, नागपूर पोलीस आयुक्तालयात श्री गणेशमूर्तीचे पारंपरिक पद्धतीने पाण्यात विसर्जन होणार आहे. काही इसम हे कृत्रिम तलाव, नैसर्गिक तलाव, नदी, सार्वजनिक विहीर आदी जलस्त्रोतांमधील तरंगत्या किंवा अर्धवट तरंगत्या, बाहेर काढून संकलित केलेल्या, कृत्रिम तलाव स्वच्छ करतांना संकलन करून ठेवलेल्या, त्यांची वाहतूक, व्यवस्थापन करतांना श्रीगणेशमुर्तीचे फोटो घेतात आणि धार्मिक भावना दुखावतील आणि सार्वजनिक शांतता भंग पावेल अशी छायाचित्रे किंवा चलचित्रे समाजमाध्यमांवर प्रकाशित किंवा प्रसारित करतात.

ज्याअर्थी उपरोक्त परिस्थितीत विसर्जनानंतर अशी छायाचित्रे काढणे, प्रकाशित करणे आणि प्रसारित करणे प्रतिबंधित करण्यासाठी तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये त्वरित प्रतिबंधात्मक कार्यवाही व उपाययोजना करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी मी विश्वास नांगरे पाटील, पोलीस आयुक्त, नागपूर शहर मला भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या विशेष अधिकाराचा वापर करून याद्वारे आदेश देतो की, कोणत्याही इसमाने विसर्जनानंतर कृत्रिम तलाव, नैसर्गिक तलाव, आदी जलस्त्रोतांमधील तरंगत्या किंवा अर्धवट तरंगत्या, बाहेर काढून संकलित केलेल्या मुर्त्या, कृत्रिम तलाव स्वच्छ करतांना संकलन करून ठेवलेल्या, त्यांची वाहतूक, व्यवस्थापन करतांना श्रीगणेशमूर्तीचे फोटो काढू नये आणि धार्मिक भावना दुखावतील आणि सार्वजनिक शांतता भंग पावेल अशी छायाचित्रे किंवा चलचित्रे समाजमाध्यमांवर प्रकाशित किंवा प्रसारित करू नये. सदरचा आदेश संपूर्ण नागपूर आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दिनांक २५.०९.२०२६ रोजी ००.०१ वा. पासून ते दिनांक ०१.१०.२०२६ रोजी २४.०० वा. पर्यंत अंमलात राहील.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम २२३ प्रमाणे शिक्षेस पात्र राहील. उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापूर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने, भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, पोलीस ठाणे, सहायक पोलीस आयुक्त, परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

सदर मनाई आदेशाचे उल्लघंन केल्यास संबंधितांवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यासाठी संबंधित पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

दिनांक :— २४.०९.२०२६
ठिकाण :— नागपूर शहर

24/09/26.
(विश्वास नांगरे पाटील)
पोलीस आयुक्त,
नागपूर शहर.